पान १ वरून

कुवेतमध्ये अग्नितांडव

बचाव कार्य राबवत अनेक कामगारांना वाचवण्यातही यश आहे. यात पाच बचाव कर्मचारी जखमी झाले. मृतांची ओळख पटवण्याचे तसेच आगीचे कारण शोधण्याचे काम सुरू असल्याचे बचाव अधिकाऱ्यांनी सांगितले. बांधकाम कंपनी एनबीटीसीने १९५ हून अधिक कामगाराच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी ही इमारत भाड्याने घेतली होती. हे कामगार २० ते ५० वर्षे वयोगटातील होते. यात बहुतांश जण हे केरळ, तामिळनाडू आणि उत्तर भारतातील राज्यांमधील कामगार होते. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक के. जी. अब्राहम हे मूळचे केरळचे असल्याचे समजते. कुवेतमधील भारतीय दूतावास आवश्यक उपाय योजना करण्यासाठी कुवेतमधील स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहे. भारतीय जखमींना पूर्ण मदतीचे आश्वासन दूतावासाकडून देण्यात आले आहे. कुवैतमधील भारतीय राजदूत आदर्श स्वॅका यांनी विविध रुग्णालयांत जाऊन जखमींची माहिती घेतली. दूतावासाने एक आपत्कालीन मदत क्रमांकदेखील जारी केला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, कुवेतच्या एकूण लोकसंख्येत भारतीयांची संख्या १० लाख अर्थात जवळपास २१ टक्के आहे, तर कामाच्या ठिकाणावर जवळपास ९ लाख भारतीय आहेत. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी जखमी तथा मृतांमध्ये आपल्या राज्यातील नागरिकांच्या समावेशबाबत आढावा घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी या दुर्घटनेप्रकरणी भारताने हस्तक्षेप करावा, अशी विनंती करणारे पत्र जयशंकर यांना लिहिले. त्याचबरोबर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनजी यांनीदेखील दुर्घटनेतील पीडितांप्रति संवेदना व्यक्त केल्या. तसेच कुवेतमधील राहत असलेल्या आपल्या राज्यातील लोकांच्या स्थिती जाणून घेण्याचे निर्देश त्यांनी मुख्य सचिवांना दिले आहेत.

दुष्काळात सापडलेल्या घटकांना बाहेर काढण्यात केंद्र सरकार अपयशी

सध्याचे मोदी सरकार हे फोडाफोडीत लक्ष देणारे सरकार असून, शेतकऱ्यांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन त्यांच्याकडे नसल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी आमदार संजय जगताप, संभाजी झेंडे, विजय कोलते, सुदाम इंगळे, प्रदीप पोमण, बाबूसाहेब माहुरकर, वाल्हेचे सरपंच अतुल गायकवाड, गिरीश पवार, सागर भुजबळ, संभाजी पवार, सचिन दुर्गाडे, देविदास भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नीरा कोळविहिरे जिल्हा परिषद गटाचे राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) अध्यक्ष हनुमंत पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राजेंद्र गायकवाड यांनी मानले.

सरकारी कांदा खरेदी केंद्रांना लागणार टाळे

कांदा खरेदी झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या कांदा खरेदी केंद्रांना लवकरच टाळे लागणार असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्रात कांद्याचे सर्वाधिक उत्पादन नाशिक जिल्ह्यात होते. मात्र शेतकऱ्यांचा कांदा बाजारात आला की, सरकारच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. यंदाही तसेच घडले. कांदा निर्यातबंदीमुळे कांद्याचे दर गडगडले. त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. शेतकऱ्यांचा रोष पाहून तब्बल चार महिने २७ दिवसांनंतर कांद्यावरील निर्यातबंदी मागे घेण्यात आली. निवडणूक काळात ४० टक्के निर्यातशुल्क लावून अघोषित कांदा निर्यातबंदी कायम ठेवली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतप्त भावना आणि असंतोष लोकसभेच्या मतपेटीतून दिसला. निवडणुकीत कांद्याने मातब्बर नेत्यांच्या डोळ्यांतून पाणी काढत, नाशिक, दिंडोरी, धुळे, शिर्डी, शिरूर, अहमदनगर, बारामती, धाराशिव, सोलापूर आणि बीड या ११ जागांवर महायुतीला पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे केंद्र सरकारने कांदा उत्पादकांचा हा रोष कमी करण्यासाठी नाफेड व एनसीसीएफच्या माध्यमातून पाच लाख टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला. परंतु १० जूनअखेर केवळ २४ हजार टन कांदा खरेदी झाला आहे.

खरे तर नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी करण्यासाठी खासगी एजन्सीची नेमणूक केली आहे. याला सुरुवातीपासून शेतकऱ्यांचा विरोध होत आहे. नाफेडने बाजार समितीत उतरून तिथे कांदा खरेदी करावी, जेणेकरून व्यापारी व नाफेड यांच्यात स्पर्धा होईल. तसेच शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळेल. मात्र नाफेडने तसे न करता केवळ खासगी एजन्सीमार्फत काही विशिष्ट लोकांकडून खरेदी सुरू केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नाफेड व एनसीसीएफ केंद्राकडे पाठ फिरवली आहे. खासगी एजन्सीची वाढलेली मक्तेदारी, बाजारभावापेक्षा ५०० रुपये कमी भाव, त्यातच यंदा प्रथमच सरकारकडून आठवड्याचे जाहीर होणारे भाव, या सर्व कारणांमुळे शेतकऱ्यांनी सरकारी खरेदी केंद्रांकडे पाठ फिरवली आहे.

> मुळात नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी ही संकल्पनाच शेतकऱ्यांना रुचत नाही. ही खरेदी बहुतांश कागदावरच होताना दिसते. त्यात कुठेही शेतकऱ्यांचा फायदा होताना दिसत नाही. त्यामुळे केंद्र सरकारला जर शेतकऱ्यांना खरेच दिलासा द्यायचा असेल, तर कांद्यावर कुठलेही निर्यात शुल्क न लावता कायमस्वरूपी निर्यातबंदी उठवावी.
>
> - निवृत्ती न्याहारकर, कांदा उत्पादक शेतकरी

संसदेचे अधिवेशन २४ जूनपासून

दिवस केवळ लोकसभेचे कामकाज चालेल. २४ जून ते २६ जून या तीन दिवसांत नवनिर्वाचित खासदारांना १८व्या लोकसभा सदस्यत्वाची शपथ देण्यात येईल. याशिवाय लोकसभा अध्यक्षांची निवडणूक पार पडेल. एनडीए आघाडीचा लोकसभा अध्यक्षपदाचा उमेदवार कोण असेल याबाबत अनेक तर्कवितर्क लढवण्यात येत आहेत. विरोधकांचे वाढलेले संख्याबळ पाहता इंडिया आघाडीकडून देखील अध्यक्षपदासाठी उमेदवार दिला जाऊ शकतो. २७ जूनपासून लोकसभा आणि राज्यसभा दोघांचे कामकाज चालेल. हे राज्यसभेचे २६४ वे अधिवेशन आहे. २७ जून रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. राष्ट्रपती आपल्या अभिभाषणाद्वारे नव्या सरकारच्या पुढील पाच वर्षांच्या कामकाजाची रूपरेषा मांडतील. यानंतर अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद ठरावावर चर्चा होईल. या चर्चेवेळी विरोधकांकडून विविध मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन्ही सभागृहांमध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद ठरावावरील चर्चेला उत्तर देतील. ३ जुलै रोजी अधिवेशनाचा समारोप होईल.

रिजिजू यांनी संसदेच्या आगामी अधिवेशात सर्व राजकीय पक्षांना रचनात्मक चर्चेचे आवाहन केले. देशाला संसदेत सार्थक चर्चा होताना बघायचे आहे. आपण दर्जेदार चर्चा केली पाहिजे. अधिवेशन सुरळीत चालण्यासाठी मी सर्व राजकीय पक्षांना सहकार्याची विनंती करतो. सर्वांना सकारात्मक भूमिका घेत सहकार्य केले तरच संसद चालू शकेल. देशसेवेसाठी आपण सर्वांनी टीम इंडिया म्हणून काम करण्याची गरज आहे, असे रिजिजू म्हणाले.

विरोधकांच्या वाढलेल्या संख्याबळाबाबत विचारले असता त्यांनी हे आव्हान असल्याचे मान्य केले. जनतेने लोकशाही प्रक्रियेनुसार एनडीएला सरकार चालवण्याचा जनादेश दिला आहे. काही पक्षांना विरोधी बाकांवर बसण्याचा जनादेश आहे. त्यांनी रचनात्मक विरोधकांची जबाबदारी पार पाडावी. संसदेचे कामकाज चालवण्याची जबाबदारी सत्ताधारी आणि विरोधक दोघांची आहे. काही मुद्द्यांवर एकमत होत नसेल तर चर्चा केली पाहिजे, असे रिजिजू म्हणाले. अरुणाचल पश्चिम लोकसभा मतदारसंघातून रिजिजू चौथ्यांदा खासदार झाले आहेत.

जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन

अर्थमंत्री ठरतील. यापूर्वी मोरारजी देसाई यांनी सलग सहा अर्थसंकल्प सादर केले होते. सार्वत्रिक निवडणूक असल्याने मोदी सरकारने फेब्रुवारीत पूर्ण अर्थसंकल्प मांडण्याऐवजी केवळ सरकारी खर्चाची तरतूद असलेले लेखानुदान मांडले होते. आता एनडीए सरकार आपला पूर्ण अर्थसंकल्प मांडणार असून, त्यामध्ये कोणत्या मोठ्या घोषणा करणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.

डंपरच्या धडकेत पोलिसासह महिलेचा मृत्यू

दिशेने जात होते. त्याचवेळी त्यांच्या दुचाकीला कोरस टॉवरजवळ भरधाव वेगाने आलेल्या एका डंपरने जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये रावते आणि त्यांच्या सोबत असलेली महिला दोघेही गंभीर जखमी झाले. या दोघांनाही तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र या दोघांचाही मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या दोघांचे मृतदेह ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या अपघाताला कारणीभूत असलेल्या डंपर चालकाविरुद्ध वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रावते यांच्या मागे पत्नी, १७ वर्षांचा मुलगा आणि दहा वर्षांची मुलगी असा परिवार आहे. ठाणे शहर पोलीस दलात २०१४ मध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झालेले रावते हे सध्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या युनिट-५ मध्ये कार्यरत होते. यापूर्वी ते पोलीस मुख्यालय, नौपाडा विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयात नेमणुकीला होते. गुन्हे अन्वेषण विभागात त्यांनी गुन्हे उघड करण्यात मोलाची कामगिरी बजावली होती. त्यांच्या निधनामुळे एका चांगल्या, कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्याला मुकल्याची भावना वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश महाजन यांनी व्यक्त केली.

नीटच्या परीक्षार्थींची तहसील कार्यालयावर धडक

अमळनेर : नीट परीक्षा प्रक्रियेत लाखो विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाबाबत अमळनेर तालुक्यातील नीटच्या विद्यार्थ्यांना घेऊन शहराध्यक्ष श्याम पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर धडक दिली. तर तहसीलदारांना निवेदन देऊन संतप्त विद्यार्थी व पालकांच्या भावना शासनापर्यंत पोहोचण्याची मागणी केली.

अमळनेर तहसील कार्यालयात तालुक्यातील नीटच्या परीक्षार्थींना सोबत घेऊन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. ५ मे २०२४ रोजी वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात प्रवेश मिळविण्यासाठी एनटीएकडून घेण्यात आलेल्या नीट परीक्षेसाठी संपूर्ण देशातून २४ लाख विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यात एकट्या महाराष्ट्रातून २.७९ लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. या परीक्षेसाठी अनेक विद्यार्थी २ ते ३ वर्षापासून तयारी करतात. त्यासाठी पालक अनेक अडचणींचा सामना करत लाखो रुपये खर्च करतात. ४ जूनला या परीक्षेचा निकाल लागला असून यात झालेल्या गैरप्रकारामुळे यात भ्रष्टाचार करून काही धनाड्य पालक व विद्यार्थ्यांनी संपूर्ण यंत्रणा विकत घेत पैकीच्या पैकी गुण मिळवले. अशा गैरमार्गाने वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी भविष्यात डॉक्टर होऊन अनेकांच्या जीवाशी ही खेळतील. त्यामुळे देशाच्या भविष्याला मोठा धोका आहे, असे या वेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पावले उचलून निट परीक्षेत अन्याय झालेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी तहसीलदार श्री. सुराणा यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे शहराध्यक्ष श्याम पाटील यांनी केली. या वेळी सामाजिक कार्यकर्ते प्रा.डॉ. लीलाधर पाटील, अमळनेर अर्बन बँकेचे संचालक रणजित शिंदे, गिरीश पाटील याप्रमुख मान्यवरांसह नीट परीक्षार्थी उर्वशी पाटील, गिताली बेहरे, ऋतुजा चौधरी, हितेश शिंदे, धनिक्षक साळुंखे, अभिजीत साळुंखे, आदित्य सनेर, सुमित गेलानी, अभिषेक पाटील, सृजन खैरनार, पीयूष क्षीरसागर, अथर्व पाटील, मानस भावरे, अथर्व कुळकर्णी, तेजस पाटील, मेहुब शिसोदे, दर्शन पाटील, सोहम शिंदे, सारंग पाटील, अंबरीष कोलाबकर, सुशीलकुमार शिसोदे, मोहतशिम काझी, विद्यार्थी व युवक चळवळीतील अनिरुद्ध शिसोदे, अक्षय चव्हाण, तुषार संदानशिव, देव गोसावी, उज्ज्वल मोरे आदींसह युवक, युवती बहुसंख्येने उपस्थित होते.

यंदाच्या नीट-यूजीत गैरप्रकाराच्या ६३ घटना : एनटीए

कथित पेपरफुटी आणि इतर अनियमिततांमुळे सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या नीट-यूजी परीक्षेतील कथित गैरप्रकारांच्या चौकशीसाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने डमी उमेदवार, नक्कल करणे, खोडखाड असे विविध गैरप्रकार झाल्याच्या ६३ घटना उघडकीस आणल्या आहेत. हे गैरप्रकार करणाऱ्या २३ विद्यार्थ्यांचा यंदाचा निकाल रद्द करून त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार १२ विद्यार्थी पुढील तीन वर्षे नीट परीक्षेला बसू शकणार नाहीत. ९ विद्यार्थ्यांवर दोन वर्षे तर २ विद्यार्थ्यांवर एका वर्षाची बंदी घालण्यात आली आहे. ४० विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती एनटीएचे महासंचालक सुबोध कुमार सिंह यांनी दिली.

यंदाच्या परीक्षेत १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क देण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात ग्रेस मार्क देण्यावरून वाद निर्माण झाल्यानंतर शिक्षण मंत्रालयाने तपासासाठी चार सदस्यीय समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घ्यायची की, इतर कोणती पर्यायी व्यवस्था करायची याचा निर्णय समितीच्या शिफारसीनुसार घेण्यात येईल, असे सुबोधकुमार यांनी सांगितले. यंदा तब्बल ६७ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाल्याने ते अव्वल आले आहेत. अव्वल स्थानावरील विद्यार्थ्यांची एवढी मोठी संख्या देखील वादात सापडली आहे. ७२० पैकी ७२० गुण मिळवलेल्या ६३ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्राच्या उत्तर तालिकेतील दुरुस्तीमुळे तर ६ विद्यार्थ्यांना त्यांचा वेळ वाया गेल्याने अधिक गुण दिल्याचे एनटीएने सांगितले. ग्रेस मार्क मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी केवळ दोन विद्यार्थ्यांना ७१९ व ७१८ गुण आहेत.

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO (2024_DOAWB_1040835_1)
CONSTRUCTION OF 1000 MT CAPACITY WAREHOUSE BUILDING AND SEED PROCESSING SHED WITH ANCILLARYWORK 191.35 Sq.M

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded (SMART) Project. ***Krushi Sampanna Farmer Producer Company Ltd. Dahid Tq. Dist Buldhana*** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is ***Rs. 152.92 lakhs.*** The bid document is available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date submission of online bid is **04/07/2024 up to 05:00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned website only.
District Implementation Unit, SMART Project Dist : Buldana
Mo. 9850695073, E-mail : krushifpc0421@gmail.com

कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि., अंकुशनगर ता. अंबड जि. जालना
फोन नं. ०२४८३-२७९३२३, २७९६२४, २७९६२९, मो.नं.९६२३४५७०७०, ९६२३०१३००७

त्वरीत पाहिजेत दि. १२/०६/२०२४

आमचे कारखान्याचे युनिट नं. १ अंकुशनगरकडे खालील जागा त्वरीत भरावयाच्या आहेत. तरी सदर पदावर काम केलेल्या अनुभवी इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज, शैक्षणिक पात्रता, वय, पुर्वानुभव, सध्याचा पगार व अपेक्षित पगार इत्यादी माहितीसह आपले अर्ज दिनांक १९/०६/२०२४ पर्यंत hrmsamarthsugar@gmail.com या मेल आयडीवर पाठवावेत. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सदर पदासाठी सोमवार, दिनांक २४/०६/२०२४ रोजी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार आहे. मुलाखतीस शैक्षणिक पात्रता, वय, पुर्वानुभव, सध्याचा पगार व अपेक्षित पगार इत्यादी माहितीसह हजर रहावे. अनुभव नसल्यास मुलाखत घेतली जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

अ.क्र.	पदाचे नांव	शैक्षणिक पात्रता	संख्या
१	कार्यकारी संचालक	कोणत्याही शाखेचा पदवीधर शासन मान्यताप्राप्त कार्यकारी संचालकांचे यादीमध्ये नाव असणे आवश्यक	०१
२	फायनान्स मॅनेजर	सी.ए./आय.सी.डब्ल्यु.ए., एम.कॉम/बी.कॉम., जी.डी.सी.ॲण्ड ए	०१
३	डे. चीफ अकौन्टंट	सी.ए./ आय.सी.डब्ल्यु.ए., एम.कॉम/बी.कॉम., जी.डी.सी.ॲण्ड ए	०१
४	फायनान्स अकौन्टंट	एम.कॉम/बी.कॉम., जी.डी.सी.ॲण्ड ए	०१
५	शुगरसेल अकौन्टंट	एम.कॉम/बी.कॉम., जी.डी.सी.ॲण्ड ए	०१
६	स्टोअर अकौन्टंट	एम.कॉम/बी.कॉम., जी.डी.सी.ॲण्ड ए	०१
७	मुख्य शेती अधिकारी	एम.एस्सी./बी.एस्सी (ॲग्री)	०१
८	डेप्युटी चीफ इंजिनिअर	बी.ई. (मेकॅ.)/डीएमई,बॉयलर प्रोफिशियन्सी पास	०१
९	डे. चिफ केमीस्ट	बी.एस्सी., ए.व्ही.एस.आय.	०१
१०	सुरक्षा अधिकारी	पदवीधर/एच.एस.सी उत्तीर्ण (मिल्ट्री रिटायर्ड)	०१

अर्जाचा नमुना :- १) पदाचे नाव, २) अर्जदाराचे पुर्ण नाव व पत्ता, मोबाईल नंबर, ३) शैक्षणिक पात्रता, ४) जन्म तारीख, ५) सध्याचा पगार, ६) अपेक्षीत पगार, ७) एकुण अनुभव (कारखान्याचे नावासह), ८) प्रत्यक्ष पदावर काम केल्याचा अनुभव (कारखान्याचे नावासह)

टीप : १) सदर जागेवर प्रत्यक्ष ५ ते ७ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक आहे.
२) अनु.जाती/अनु.जमाती पात्र व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
३) मुलाखतीस स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल. कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

उपाध्यक्ष — अध्यक्षा

पावसामुळे शेती कामांना वेग

कजगाव, ता. भडगाव : कजगावसह परिसरात ४ व ५ रोजी पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी सुखावले असून आता शेती मशागतीची कामे जोमाने सुरू झाली आहेत. यंदा पाऊस वेळेवर सुरू होणार, हे आशेचे चित्र डोळ्यासमोर ठेऊन शेतीची कामे वेगाने होतांना दिसत आहेत.

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO: 2024_DOAWB_1040804
Supply, Installation, Testing and Commissioning of Optical Grader-Cleaning, Grading, Waxing Machine 4 TPH with Optical Grader

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Apegaon Agro Processor Farmers Producer Company Ltd. is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **02/07/2024 up to 03:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.
District Implementation Unit, SMART Project, Dist. Chhatrapati Sambhajinagar.

शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई
(नोंदणी क्र. बी. ओ. एम. / आर. एस. आर. / एस. १८६२-१९८२)
प्रशासकीय कार्यालय :- शिवकृपा भवन, आर २२५, टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम. आय. डी. सी. रबाळे, नवी मुंबई, ४००७०१.
☎ ०२२-६९२२११११ वेबसाईट : www.shivkrupapatpedhi.com

जाहीर निविदा

१. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, वार्षिक अहवाल व इतिवृत्त छपाई करणे करीता नामांकित प्रिन्टर्स कडून मोहोरबंद निविदा मागवण्यात येत आहेत.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीस पोस्ट करणे करीता पोस्टाच्या अधिकृत एजन्सीज कडून मोहोरबंद प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे छापील निविदा फॉर्म, फी भरणा करुन **दि. 20 जून 2024** पर्यंत उपरोक्त पत्त्यावर उपलब्ध आहेत. निविदा फॉर्म **दि. 27 जून 2024 रोजी दु. 3.00 वा.** पर्यंत संस्थेच्या उपरोक्त पत्त्यावर स्विकारण्यात येतील.
टिप :- कोणतीही निविदा, प्रस्ताव, अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.
दिनांक :- 13/06/2024 — **- मुख्य कार्यकारी अधिकारी**

ऑफर — घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी — ऑफर
APPOINTMENT
ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.
आता सवलतीच्या दरात

उत्तर महाराष्ट्र	रु. ५०००/-
मुंबईसह कोकण विभाग	रु. ५०००/-
मराठवाडा विभाग	रु. ५०००/-
पश्चिम महाराष्ट्र	रु. ५०००/-
विदर्भ	रु. ५०००/-
कोणतेही दोन विभाग	रु. ७५००/-
कोणतेही तीन विभाग	रु. ११५००/-
कोणतेही चार विभाग	रु. १५५००/-
संपुर्ण महाराष्ट्र	रु. १९५००/-

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२३ पासून लागू.
स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार
जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा **18002081019**
E-mail:customercare@sapp.in

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी – कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : १ ला मजला, इंदिरा हाईट्स, प्रमोद महाजन उद्यानाजवळ, डोंगरी वसतिगृहासमोर, जुना गंगापूर नाका, नाशिक – ४२२००५

नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई –लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री " जसे आहे जिथे आहे " , " जसे आहे जे आहे " तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
ए	बी	सी	डी	इ	एफ	जी
१	समीर बालकृष्णा कोळपकर (कर्जदार), शोभा बालकृष्ण कोळपकर (सहकर्जदार). कर्ज खाते क्र. एलएचएनएएस ००००१३७४३६१ व एलएचएनएएस ००००१३७४४०८	फ्लॅट क्र. १०, ४ था मजला, सिद्धकला अपार्टमेंट, सीटीएस क्र. २७९, २८४ ते २८९, ओझरगांव, ता. निफाड, जि. नाशिक – ४२२२०६	१४,००,२२२/- दि. ०४ जून, २०२४	रु. १५,८३,५५०/- / रु. १,५८,३६०/-	२६ जून, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	०३ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** – https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार / सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **२ जुलै, २०२४** रोजी **संध्याकाळी ५.००** पर्यंत अदा करावे.त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / धनाकर्ष डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, १ ला मजला, इंदिरा हाईट्स, प्रमोद महाजन उद्यानाजवळ, डोंगरी वसतिगृहासमोर, जुना गंगापूर नाका, नाशिक – ४२२००५** येथे **दि. ०२ जुलै, २०२४ रोजी संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. प्रस्तावित बोलीदारांनी नोंदणीकरण प्रपत्र व बोली अटी व शर्तींची स्वाक्षरीत प्रतसुद्धा **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, १ ला मजला, इंदिरा हाईट्स, प्रमोद महाजन उद्यानाजवळ, डोंगरी वसतिगृहसमोर, जुना गंगापूर नाका, नाशिक – ४२२००५** येथे **दि. ०२ जुलै, २०२४ रोजी संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करावी. इसारा रक्कम ठेवीचा धनाकर्ष (डीडी) हा राष्ट्रियीकृत बँकेचा / शेड्युल बँकेचा आणि ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड– लिलाव**'' यांच्या नावे आणि **नाशिक** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड – ९९२०८०७३०० किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : १३ जून, २०२४
स्थळ : नाशिक
प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय** : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी – कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : २ रा मजला, प्रतीक आर्केड, विद्युत भवनाच्या समोर, बिटको पॉइंट, नाशिक रोड, नाशिक – ४२२ १०१.

स्वाजगी कराराच्या माध्यमातून अचल संपत्तीच्या विक्रीची सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (८) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या विक्रीची सूचना

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी)ने खालील निर्देशित गहाण मालमत्तांच्या विक्रीकरिता काही लिलाव आयोजित केले होते, तथापि, सर्व लिलाव अयशस्वी ठरले. आता, एका इच्छुक खरेदीद